Tech सफर

abhijeetovhal66@gmail.com



# इसुझुचे पिक-अप ट्रक्स

इसुझु मोटर्स इंडियाने जगात सर्वाधिक विक्री होणाऱ्या डी-मॅक्स या पिक-अप ट्रक्सची भारतात बनवली गेलेली श्रेणी दाखल केली. यामध्ये डी-मॅक्सच्या तीन मॉडेल्सचा समावेश आहे. टू-केबिन पर्याय आणि टू डेक पर्याय. डी-मॅक्स सिंगल कॅब ही फ्लॅट डेकसह उपलब्ध असून डी-मॅक्स स्पेस कॅब फ्लॅट आणि आर्च्ड डेक अशा दोन्ही पर्यायांमध्ये उपलब्ध आहे.

या शक्तिमान डी-मॅक्सला २४९९ सीसी, ४-सिलिंडर इंटरकूल्ड टर्बोचार्ज्ड डिझेल इंजिनने शक्ती पुरवली जाते. त्यासोबत ५-स्पीड मॅन्युअल ट्रान्समिशनचा मेळ घालण्यात आला आहे. हे सर्वशक्तिमान इंजिन १३४ एचपी .... ३६०० आरपीएम इतक्या शक्तीचे आणि १८००-३२०० आरपीएस रेंजमधील २९४ एनएम इतक्या टॉर्कचे निर्माण करते. त्यामुळे डी-मॅक्सला १.२ टनाचे वजन अत्यंत लिलया उचलता येते.

इसुझुच्या डी-मॅक्समध्ये हेवी ड्युटी चॅसिस, मोठ्यात मोठे सामान मावण्याकरिता मोठा कार्गो बेड आणि अतिशय उच्च टेन्साईल शक्ती लाभलेल्या स्टीलपासून बनलेली रचना यांचा समावेश आहे. या ट्रकचे बाह्यस्वरूप अतिशय भव्य आणि आक्रमक असून आतील भाग अतिशय अत्याधुनिक आणि पॅसेंजर कारशी साधर्म्य सांगणारा आहे. डी-मॅक्सचा बाह्य भाग अतिशय आधुनिक आणि स्टायलिश असून अंतर्भाग ऐसपैस आणि स्टायलिश पद्धतीने तयार केलेला आहे. त्यामुळे ड्रायव्हर आणि उतारूंना एसयूव्हीमध्ये बसल्याची भावना होते. या नवीनतम डी-मॅक्समधील सीट्स दीर्घ प्रवासातही आराम देण्याच्या दृष्टीने डिझाईन करण्यात आल्या आहेत.

भारताकरिता संपूर्णपणे नवी संकल्पना असलेल्या डी-मॅक्स स्पेस कॅबच्या खास वैशिष्ट्यांमध्ये ड्रायव्हरच्या सीटमागील १.५ फुटाच्या विस्तृत जागेचा समावेश आहे. ज्यामध्ये मूल्यवान, नाजूक गोष्टी ठेवता येऊ शकतील. डी-मॅक्स स्पेस कॅबमध्ये पॉवर स्टिरअरिंग, पॉवर विंडोज, सेंट्रलाईझ्ड डोअर लॉक, एसी आणि हीटर इत्यादी वैशिष्ट्यांसोबत सुरक्षाविषयक वैशिष्ट्येही पुरवण्यात आली आहे. यामुळे हा पिक-अप ट्रक शेती रिटेल, डेअरी, इंजिनीयरिंग, निर्माण क्षेत्राकरिता आणि छोट्या व्यावसायिकांच्या कामी येऊ शकेल. स्पेस कॅन अल्पाईन व्हाईट, स्टर्लिंग मेटॅलिक सिल्व्हर आणि नॉटिलस ब्ल्यू अशा तीन रंगांमध्ये उपलब्ध आहे.

भारतामधील व्यावसायिक वाहनांच्या वर्गवारीमध्ये पिक अप ट्रक्स ही शाखा अतिशय मोठी आणि वेगाने वाढणारी शाखा म्हणून ओळखली जाते. व्यावसायिक वाहनांच्या बाजारपेठेत या शाखेचा वाटा ३५ टक्के इतका आहे. २०२३ पर्यंत भारताला एक टन पिकअप ट्रक्सकरिता जगातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून ओळखले जाईल, असा अंदाज आहे. महाराष्ट्र ही पिकअप ट्रक्सची देशतील सर्वात मोठी बाजारपेठ मानली जाते. या वर्षी मुंबईनंतर कंपनी नाशिक आणि पुण्यात इसुझु कंपनी आऊटलेट्स सुरू करणार आहे. डी-मॅक्स हा जगात सर्वाधिक विक्री होणार पिक अप ट्रक ब्रण्ड आहे. इसुझुच्या डिझेल इंजिन तंत्रज्ञानाने युक्त असलेला डी-मॅक्स कार्यकारी इकॉनॉमी पुरवतो. जगातील इतर भागात आपले निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केलेला डी-मॅक्स पिक अप ट्रक देशातही आपले वर्चस्व प्रस्थापित करेल आणि पिक अप ट्रक्सच्या शाखेत क्रांती घडवून आणेल, असा दावा कंपनीने केला आहे.

■ अभिजीत ओव्हाळ